# सैनिक स्कूल सातारा - प्रवेश परीक्षा

## अखिल भारतीय सैनिक स्कूल प्रवेश परीक्षा २०१९- २०२०

(शाळा वेबसाईट www.sainiksatara.org)

१) सैनिक स्कूल, सातारा येथे इयत्ता ६ वी आणि ९ वी साठी वर्ष २०१९- २० सत्राच्या परिक्षेसाठी पात्र विदयार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश परीक्षा दिनांक - ०६ जानेवारी २०१९ (रविवार) रोजी घेण्यात येईल.

२) प्रवेश परीक्षा 'ओ. एम. आर.' पद्धतीने घेतली जाईल, ज्यात उत्तरे बहुपर्यायी असतील. शाळेचे माहितीपत्रक वेबसाईटवर उपलब्ध आहे.

३) वयोमर्यादा पध्दती :

| इयत्ता | वयोमर्यादा | निवड पध्दती | अंदाजे जागा |
|---|---|---|---|
| इयत्ता ६ वी | विद्यार्थी ०१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००९ (दोन्ही दिवस धरून) या दरम्यान जन्मलेला असावा. | १) लेखी परीक्षा आणि वैद्यकीय चाचणी परीक्षा. २) प्रवेश फक्त गुणवत्तेवरच दिला जाईल. | ६३* (त्रेसष्ट) |
| इयत्ता ९ वी | विद्यार्थी ०१ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००६ (दोन्ही दिवस धरून) या दरम्यान जन्मलेला असावा व सध्या मान्यताप्राप्त शाळेत इयत्ता ८ वी मध्ये शिकत असावा. | | ०७ * (सात) |

*अंदाजे जागांची संख्या शाळेतून पास आऊट व सोडून जाणाऱ्या संख्येनुसार कमी किंवा जास्त होऊ शकते.

४) अर्ज कसा करावा.- विद्यार्थी प्रवेश परीक्षा फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरू शकतात. प्रवेश परीक्षा अर्ज दि. ०८ ऑक्टोबर २०१८ ते २६ नोव्हेंबर २०१८ पर्यंत **sainikschooladmission.in** किंवा **www.sainiksatara.org** वेबसाईटवर उपलब्ध असतील. ऑनलाईन अर्ज जमा होण्याची अंतिम तारीख ०१ डिसेंबर २०१८. प्रवेश परीक्षा नोंदणी शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. ते खालील प्रमाणे
अ) सामान्य वर्ग (जनरल), संरक्षण दलातील आजी/माजी कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी - रु. ४००/-
ब) अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या वर्गातील मुलांसाठी - रु. २५०/-

५) राखीव जागा- अनुसूचित जाती १५%, अनुसूचित जमाती ७.५ %, उरलेल्या जागांपैकी ६७ % जागा महाराष्ट्रातील मुलांसाठी तर ३३% जागा इतर राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील मुलांसाठी पुरुष लोकसंख्येवर आधारीत राखीव आहेत. आजी व माजी सैनिकांची मुले २५%

६) प्रवेश परीक्षा केंद्र-

| इयत्ता ६ वी | इयत्ता ९ वी |
|---|---|
| अहमदनगर, कोल्हापूर, लातूर, महाड, मुंबई, नागपूर, नांदेड, नाशिक, पुणे, सोलापूर, सातारा. | फक्त सातारा |

७) अपूर्ण भरलेले अर्ज रद्द केले जातील. मुदतीनंतर ऑनलाईन फॉर्म भरता येणार नाही. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाच्या रकमेची परतफेड होणार नाही. अधिक माहितीसाठी शाळेच्या वेबसाईटला वेळोवेळी भेट द्यावी. किंवा शाळेच्या ०२१६२ - २३५८६० / २३८१२२ या टेलिफोन नंबरवर संपर्क साधावा.

८) सैनिक स्कूल सातारा हे प्रवेश परीक्षेसंदर्भात कोणत्याही मार्गदर्शन केंद्राला किंवा एजंटला प्रोत्साहन देत नाही. शाळेत प्रवेश फक्त लेखी परीक्षा आणि वैद्यकीय चाचणीच्या आधारे दिला जातो.

९) धोरणात वेळोवेळी बदल झाल्यास ते बदल करण्याचे अधिकार शाळा प्रशासनास आहेत.

प्राचार्य सैनिक स्कूल, सातारा